पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८ लेखा विभाग
क्र.लेखा/कावि/२३/१०१३
दिनांक :- १८/११/२०१३

**विषय :- गट विमा प्रकरण पाठविताना ई.सी.एस. फॉम भरुन प्रकरणासोबत देण्यात यावे.**

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लेखा विभागात सेवानिवृत्ती, मयत कर्मचारी, स्वेच्छानिवृत्ती कर्मचा-यांचे गट विमा प्रकरण गट विमा क्लेम मिळण्यासाठी अर्ज येतात. तरी यापुढे अशा कर्मचा-यांचे गट विमा व क्लेमचे अर्ज पाठविताना खालील बाबींची पुर्तता करुनच प्रकरण पाठविणेत यावे.

१) कर्मचा-यांचे/वारसदारांचे गट विमा मिळणेबाबतचा अर्ज.
२) संबंधित विभाग प्रमुख यांच्या शिफारशीनुसार पाठविलेला अर्ज.
३) सेवानिवृत्ती/मयत/स्वेच्छानिवृत्ती झालेबाबत प्रशासकिय आदेश.
४) निवृत्ती वेतन/सेवा उपदान मंजुरी आदेश (PPO).
५) कर्मचारी मयत झाले असेल तर गटविमा प्रकरणासोबत ओरिजनल मृत्यु दाखला जोडणे.
६) गटविमा क्रमांक नमुद करावा व शेवटचा वजाती केलेला तक्ता प्रकरणासोबत जोडणे.
७) ई.सी.एस. फॉम महापालिकेच्या वेबसाईडवरुन लेखा विभागाचे परिपत्राकामधुन डाऊनलोड करुन घेण्यात यावे व सदरचा फॉर्म प्रिंट काढुन बँकेच्या सही शिक्यानुसार संपुर्ण भरुन प्रकरणासोबत जोडावा. ई.सी.एस. फॉम नसल्याने गट विमा प्रकरण स्वीकारले जाणार नाही.
८) सेवानिवृत्ती/मयत/ स्वेच्छानिवृत्ती झालेल्या कर्मचा-यांचे प्रकरण सहा महिन्याच्या आत पाठविणेत यावा.

उपरोक्त बाबींची पुर्तता करुनच यापुढे लेखाविभागात, गट विमा प्रकरण सादर करण्यात यावी याची नोंद घ्यावी.

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

प्रत:-
सर्व शाखाप्रमुख / शाखाधिकारी